म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का. वा.
दा. क्र.

# गीत-

IRBK-0102007
IRBK-0102007

म. ग्रं. मं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
क्र. नं. ३०३

# गमती



किशोर-किशोरींची अभिनय-गीतें
[ मूल्य १० आणे. ]

अमर ज्योति
वाङ्मय

# 'अमर ज्योति वाङ्मय'

[ स्थापना ५ डिसेंबर १९४३ ]

चालक:— सौ. स्नेहल सामंत, बी. ए.

मुख्य संपादक: श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.

५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें, प्रस्तुत ('ज्योति-सामंत-स्मारक ) संस्थेचा, दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, **लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.**

उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक **असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें** हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें '**मनोरंजक**' व '**ज्ञान**' असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें–१ ) '**शिशुश्रेणी**' ( वय वर्षें ७ पर्यंत ), ( २ ) **बाल-श्रेणी**' ( वय वर्षें १२ पर्यंत, ) ( ३ ) '**किशोर श्रेणी**' ( वय वर्षें १४, ) व ( ४ ) '**कुमार-श्रेणी**' ( वय वर्षे १७ पर्यंत ) आम्हीं सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या-टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षी होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

तथापि, दरवर्षी होणाऱ्या या '**दिपावली प्रकाशनां**' च्या गटाची व्याप्ती सर्व विभागांपर्यंत व सर्व टप्पां-श्रेणींपर्यंत पोहोंचणें, हें संस्थेच्या आदल्या वर्षीच्या प्रकाशनाला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर, संस्थेच्या स्थिर आर्थिक परिस्थितीवर व त्या त्या वेळच्या भोंवतालच्या अनुकूल प्रतिकूल परिस्थितीवरच अवलंबून रहाणार, हें अर्थात्च लक्ष्यांत घेतलें पाहिजे.—तरी पण होतां होईतों **कमींत कमी बारा ते अठरा पुष्पांची गुंफण दर दिवाळींत संस्था करूं शकेल** अशी आमची आज तरी इच्छा-आकांक्षा आहे. आम्हाला तशी उमेद आहे.

म. वि. सं. ठाणे, वाचनालय शाखा, १
वा. क्र. ........ नों. दि ................
वि. ........ ................

# — गीत-ज्योती —

[ किशोर-किशोरींच्या अभिनय-गीतांचा ]

अभिनव सचित्र काव्यसंग्रह.

— कर्ता —

रघुवीर सामंत

रघुवीर सामंत संपादित

अमर

ज्योति वाङ्मय

IRBK-0102007

IRBK-0102007

मूल्य १० आणे ] धनत्रयोदशी १९६६ [ प्रथमावृत्ति

**पालकांस—**

★


आजच्या प्रतिकूल परिस्थितींतही हें पुस्तक सर्वांग सुंदर करून पुन्हां तें परवडेल तेवढ्या कमींत कमी किंमतींत किशोर-किशोरींच्या हातीं देण्याची आम्ही कोशीस केली आहे. याचें बरेंचसें श्रेय मुद्रणस्थळाचे व्यवस्थापक श्री. अप्पा फाटक यांना आहे. असल्या पुस्तकाचें, मुलांचे पालक योग्य तें चीज करून संस्थेला हातभार लावण्याइतके रसिक ठरतील अशी फार आशा आहे. पुढील आवृत्तीचा योग आल्यास अधिक स्वस्त किंमतींत पुस्तक देण्याचा प्रयत्न आम्ही जरूर करूं.

चालक:—'अमर ज्योति वाङ्मय'

प्रकाशक:-सौ. स्नेहल सावंत, बी. ए.
चालक:—'अमर ज्योति प्रकाशन'
१४ बी. हरजीवनदास एस्टेट व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४
मुद्रक:-केशव उमाजी खानविलकर
खानविलकर लिथो प्रेस, मुंबई, नंबर २

म. ग्रं. सं. ठाणे.

५ डिसेंबर १९४०
रोजी जन्मलेल्या
सर्व बाल--बालिकांस-
अर्पण.
-रघुवीर सामंत.



# सका



१

सकाळ झाली !....उठा ! उठा !–उत्साहाची मौज लुटा ! !
ललकारुन रव,....उंच, चढा,....आरवतो हा कोंबडा.
" उठा ! "....म्हणे तो जगताला,....." उत्साहानें न्हाउं चला ! "
शिंग फुंकि तो तोऱ्यांत;....नाद उसळतो वाऱ्यांत !–
किलबिल, किलबिल....पक्षांची !–धांदल त्यांची कामाची !
हंबरतें हें वासरूं !....धार दुधाची चुरूं चुरूं !–
गोड गळ्यावर, आजींच्या,....भजन–आरत्या शेजींच्या !
जात्याची घरघर दूर !–चूल पेटल्याचा धूर ! !—

× × ×


[ अर्ध्या उघड्या डोळ्यांनीं,...जग बघतें भांबावोनी ! ]

२

वारा वाहे भराभरा !—जागें करतो चराचरा !
—सुगंध उधळित चौफेर,...शीळ घालतो तो स्वैर !
सडा फुलांचा भवतालीं,....थरथरती झाडें–वेली !
सृष्टि–देवि शालू ल्याली !—पूर्वेच्या वदनीं लाली !
गुलाल आकाशीं भरला !....सुवर्ण–मेघांच्या माला !–

× × ×

[ जागृत जगतावर साऱ्या, ताड—माड धरती चवऱ्या ! ! ]



# दूर खेडेंगांवीं



३

डोंगर–माथ्याच्या आड,....लपण्याचें कोणा वेड ?....
—कुणी फेंकले नभावरी,....लाख कवडसे सोनेरी ? ?....
आला रे आला चोर !....आणूं त्याच्यावर हार ! !....
....चला !—पळा !—पाहूं त्याचा,....लपंडाव पूर्वेकडचा ! !

× × ×


[ पकडा रे ! उघडा डोळे !–सूर्य–बिंब तें वाटोळें ! ! ]

★

१२-८-४४



# राजे से





१

हे राजे अमुचे मारे बसती अपुल्या गादीवर—
(मउमऊ सिंहासन सुंदर !)

ते ल्हरी मोठे !–बसती, हसती, निजतिहि सिंहासनीं—
(त्याविना चैन न त्यांच्या मनीं !)

अन् आसन त्यांचें सदा डुलावें !–यांनीं डोलावें—
(म्हणुन मग नवे नवे कावे !)

अति नापट अमुचे राजे !–त्यांची मर्जि राखती जन—
(वचकुनी धरती दातीं तृण !)

२

तो थाट–माट तेवढा नेटका, पटतो !–परि ते ठक !—
(त्यांचें लाडुक खट–नाटक !)


ते कामापुरते कोणालाही सामा करतिल भले !—
(सोडति न सिंहासन आपलें !)

जरि गादीवर थाटलें सदा !–परि डोळे खाण्यावरी !—
(स्वारिची वृत्ति पुरी हांवरी !)

बहु आवडती त्या वड्या नि पेढे,–बदाम–बेदाणा !—
(हातचे देति न परि ते कुणा !)



# हासनीं




काधि करतिल कांगावा, अन् ओरड, काढुनि तार स्वर !—

( घेतिल डोक्यावरती घर !—)

३

मग येईल धांवुन, राज्यामधली सर्व प्रजा-मंडळी !--

( फिरुन मग खुलेल यांची कळी !—)

अन् देतिल बहुविध नजराणे, कुणि !--राणा बहु लाडका !—

( आमुचा लोभ नसे थोडका !--)

पकीत, बघतां बघतां, फिरेल चर्या ! हसेल मग स्वारी ! !–

( लाघवि न् लडाड बहु भारी !—)

× × ×

[ हा बावटला सारखा आमुच्या आईला बिलगतो !–


( कुणा ना जवळ येऊं देत तो !–)


तो बाळराज !....न्या आई म्हणजे मउमउ सिंहासन ! !—

( बसूं दे आईला घेऊन ! !--) ]

१६-८-४४.





१

मघां होतें सारें शांत—भोवोंतीं, दारा–घरांत;
—झोंपेनें झांपडलेलें,..शहर होतें घोरत ! !

÷ ÷ ÷

रड्यांचें सूर, पोरांच्या !–गजर वाजले दूरीं !
—जाग आली हळूं हळूं !–लागले दीप विजेरी !

÷ ÷ ÷

बसला ऊठून बाळ;–त्याचा बोबड्याचा खेळ !
—भरले चूळ आईनें;–चूलींत पेटला जाळ !
बशांचें गाणें मंजूळ !–( बाबांच्या चहाचा वेळ ! ! )
—आई करी धांवपळ !–( खपेना बाबांना वेळ ! ! )


÷ ÷ ÷


जागी झाली सारी चाळ;–लागला वाजाया नळ !
—भांड्या–धूण्यांचा बोवाळ !–सकाळ ! झाली सकाळ ! !

२

रस्त्याचे दीवे वीझले;–परी ना उजाडलेलें.
—अंधूक दीसतें कोठें,–अजून आभाळ काळें.
टप् टऽपऽ टांपा टाकीत, धांवती धांपत घोडे;
—हॉटेलापाशीं खड्–खडे, बर्फवाल्याचें छकडें.







कडेनें टेंकत काठी, चालण्यांत वृद्ध चूर !—
—एखादी मोटार भुर्र—येते नि धांवते दूर !
रूळाशीं खालीं खेळत,—बेफाम ट्रामा धांवती;
—दांड्यांना घासून तारा, सरसर वाजत जाती.
भाजीचे धावते भारे !—बेकरीवाल्यांचे गाडे !
—पेपर—वीक्यांची पोरें, करीती घोर ओरडे !



## ३


कशाची करकर दूर ?—कोणाची कुजबूज चाले ?
—गाड्यांनीं कावड्या आल्या;—धावती वसईवाले !!
वाजती दूर पाऊलें;—आपसांत कुणी बोले !
—वर्दळ तुर्ळक आतां;—कामाला कोणी निघाले !!
कडेला जे झोपलेले,—आवाजानें जागे झाले !
—आळस देत ऊठले;—बिछाने बांधून गेले !!
पाटींत पेंगूळलेला,—ऊठला तो पाटीवाला !
—लावून पाटी डोक्याला,—हमालीमागें निघाला !
कामकरी—गडी चाले,—हातांत शिदोरी हाले;
—गिरण्यांचे भोंगे झाले !—रांगेत आंत शिरले !

÷ ÷ ÷

नाही ही झोंपेची वेळ !—सकाळ झाली ! सकाळ !!
—फिरून जागें शहर !—चौफेर आतां गोंधळ !!

२१-८-४४





[ पात्रें:—तेरा एक वर्षांची 'ताई', दहा-अकरा वर्षांचा तिचा पाठचा भाऊ-'कुमार शरद्' उर्फ बाळ्या; त्यांची आई.

स्थळ:—दोन खोल्यांचा ब्लॉक. आंत पॅसेज, न्हाणीघर, स्वयंपाकघर वजा आंतली खोली.

काळ-वेळ:—रविवार; सकाळीं सुमारें ९। वाजतां. ]



१

[ पुढल्या हॉलवजा खोलींत पडलेल्या एकट्याच अस्ताव्यस्त गादीवर, बाळ्या पांघरुणांत गुरफटून अधिकच अस्ताव्यस्त पडला आहे; ताई त्याला उठवण्याचा प्रयत्न करीत आहे. ]

"चल्, उठ रे, बाळ्याऽ! कितीदां सांगू ?–उजाडलंऽ ! ऊठ !....
—मी ओरडतें सारखी मघाची !–ढोंग पुरे खोटं ! "

( पांघरुण अधिकच डोक्यावर गुरफटून बाळ्या 'अँऽ' करतो. )

" एऽ! आतां बघ् हं !–'अँऽ' 'उंऽ'–नाहीं चालणार कांहीं !—
—ही तुझिच आळशा, उरली गादी !–आवरली नाहीं!!"

( त्याच्या अंगावरचें पांघरुण फरकन् ओढून घेते; तो ओरडतो. )

" जा !–उठत् नाहीं जा !!–ताइटले, मी असा झोंपणार !. ..
—जा !–कांहीं कर तूं !....आज आमुचा आहे रविवार !!–"

( खेनचटपणें बोलत, त्याचें आव्हान स्वीकारून–)

" अंऽ ?–हो कां ?–तर मग्...अतां पाहते, उठत कसा नाहीं !–
—हं !–गणपतिबाप्पाऽ ! बसा बाजूला ! करा आतां कांहीं !!"

( अलगद उचलून त्याला बाजूला ठेवत ताई हसते. कुमार बाळ्या चिडतो. बिछाना गुंडाळत असलेल्या ताईच्या पाठींत रागारागानें दोन तीन जोराच्या चापट्या लगावतो. )



२

" हाय !....काय् रे दुष्टा !–किति जोरानें मला मारलेंस ?..."
—"मग् तू तरि माझ्या कां ग, तायडे, गेलिस् वाटेस ??"

( हिवल्या-बावल्या करणाऱ्या बाळ्याला ताई लगावते. )

" मग घे तर करतें फिटंफाट ही मीहि चापटीनें ! "

" ए बघ् ग, आईऽ ! मला मारलं या ताइटलीनें ऽ ! !—"

( ताई बिछाना उचलून घरांत वळत, हेटाळणीने हसते. )

" या !. पहा पहा रेऽ अमुचे बंधू !....भागुबाइ–वीरऽ !!..

# दादागिरी !



-हे आईपाठीं दडति सदा !—अन् म्हणति आम्ही शूर !!"

( आंतून आई रागानें कुरकुरते...ताई हसतच असते-)

अग्, लहान कां तूं, ताई ?....कसली हुज्जत पोराशीं ??—
—चल् बाळू, तूं तरि ये बघुं इकडे !....भांडुं नको तिजशीं !"

( फूस मिळून, आत जातां जातां, बाळ्या टिवल्या-बावल्या करतो-)

३

"ओऽऽ कशि जिरली ?....चल् ताऽइ, पाणि दे, अणखी राखुंडी ?"
—"तूं घे जा हवि तर !....तोंड अतां कां फिरविशि रडकुंडी ?"

( स्वयंपाकघरांत येतात; आई एकदम रागानें, ताईला—)

"हं ऽ....असं काय ?....तूं बहिण थोरली !—ऐक जरा त्याचं !!
—अन् उद्यां सासरीं करशिल कैसं आपुल्या बाळाचं ??"


( बाळ्या खुलतो : ताई धुसपुसते; पण त्याचं ऐकते-)

"हें तुझं नेहमीं असंच, आई !—याला मार हवा !—
—हे आले मोठे बाजिराव कुणि !....घ्या !—चढवुन ठेवा !!"

४

( तोंड धुवून बाळ्या चुलीजवळ बसतो; दूध घेऊं लागतो-)

ही कुणी ठेवली बशी, मला ?....बघ्..बुरसटली सगळी !—
—हं...ताइबाइ घ्या ! पुन्हां धुण्याची तुमच्यावर पाळी !-"



( आई हसते: ताई रागानें पुटपुटत बशी धुवून बाळ्यापुढें ठेवते:-)

"किति छळशिल रे बाळ्या तूं ? अगदीं....मुळिं न तुला धाक !-
—जर करशिल तोरा आणखी....तर बघ देइन चपराक !"

( दूध पितां पितां कुमार बाळ्या ताईकडे पाहून विजयी हसतो-)

"अग जा !-हीं कामें अमुचीं कां ?-मग तुम्ही काय करतां ??
—आम्हि पुरुष मिळवतो पैसे !....अन् ही चूल तुम्हि करतां !!-"

"हो हो रेऽ!....आला पुरुष मोठा !!....कां फुकटचा बाता ??-
—तुझि विजार कितिदां सावरतों आम्हि ती गळतां गळतां !!"




५

( दूध गटगटा पिऊन, रागानें जागचा उठत बाळ्या ओरडतो-)

"तूं...ताकड-फाकड-माकड कुठली !—बघ ना गऽ आई ?-"

( ताई मोठ्यानें हसते: आई गालांतल्या गालांत हसते. बाळ्या चिडून ताईला मारायला धांवतो. )



—"चल् जा. अप्ला तूं स्नान करून घे!–पाणि दे ग, ताई !"
" हो अडलंय् खेटर अमूचं आतां !....खुशाल ओरडुं दे !–"
—" हं ताई ऽ बघ हंऽ ! गुप्चुप् पाणि, न्हाणिघरांत नेउन् दे !!"
" चल् ये हं बाळा !....काढुन देतें मीच तुला पाणी !—"
—" त्रा: !--कशि पण् जिरली छान् !-बघा रेऽपुरुषाचं पाणी !!"

६

( आईच्या समजावणीनें आईमागून जाणारा बाळ्या एकदम रागानें परत फिरतो. )

" ए ताइटले ऽ ! तू टुवाल घेऊन् उभी रहा दारीं !
—तूं सांग ग, आई, हिला ! नाहितर फिरतों माघारीं !"

(आई बोलत नाहीं; ताई जागची हलत नाहीं; बाळ्या जळफळतो. जागच्या जागीं बसकण घेतो. )

" या फुसक्या धमक्या देउन् नाही शिजायची डाळ !....
—तुझि टक्ळि पुरे हं !- खुशाल तूं करुं नकोस अंघोळ !! "

( बाळयाचें अडलेलें तट्टू पाहून आई त्याची बाजू घेते. )

" ताइ, पुरे अतां हं, भांडण तुमचं !—कां ग त्याची खोडी ?....
—अग लहान तो !—ऐकावं त्याचं !....तूं अगदींच घोडी !!"

( ताई नाइलाजानें समेट करते; बाळ्याची कळी खुलते. )

" बरं या !—द्या !! लावा दिवे एकदां !—दानत ही खोटी !!

( बाळ्या न्हाणीघरात मोठ्या विजयानें हसतो. )


—तूं हसूं नको !—ही दादागिरी—जंव आइ तुझ्यापाठीं !! "





# आई रागावली






पळा रे बाबांनों !—आई रागावली !!
—धडगत नाहीं !....कंबख्ती भरली !
आतां ना ती आई,—आज जगदंबा !!
—देवी कोपली रे !....फिरा मागें !!....थांबा !
बघा तिचे डोळे,....गरगर होती !
—इथें फिरूं नका,....आवतीं भोंवतीं !
लाडी-गोडी पुरे,....पुढें जाऊं नका !
—पोरांना....साऱ्यांना, आतां आहे धोका !
बशी उडाली रे;....फुटला तो पाट !
—टोपा-पातेल्यांची आदळ-आपट !
म्याले सारे प्राणी !....रागावली राणी !
—आईच्या राज्यांत आतां नका कोणी !
इथें नको आतां,....पळा ओटीवर !
—चपाटे-धपाटे, लाडू पाठींवर !
बाबा ओटीवर;....पाहुणे बाहेर !
—तिथें ना आईचा कांहीं चाले जोर !!

× × ×

[ मला वाटतें....हा बाबांवर राग !
—त्याचेंच उट्टें हें !....आम्हाला कां भोग ? ]

२-३-७-४४



★





१

चांद उगवला आकाशीं !–

–नभांत तेजाच्या राशी.

हवेंत चंदेरी धूर !....

–पालटला सारा नूर !

दूध उचमळे नभांतुनी !–

–साय पसरली ग गगनीं !

लोण्याचा गोळा तरतो !–

–वितळुन भूवर ओसरतो !

२

दाहि दिशांवर दूरवरी,....

चंद्र–चंद्रिका राज्य करी !–

सहस्र तारांचा मेळा,....

खेळाचा त्यांना चाळा !–


भवतीं तरते शुभ्र ढगे !–

तारां लपति त्यांमागें !–

हसति, लाजति, चमचमती !–

गोड गोड त्यांच्या गमती !





## ३

झुळुं झुळुं मंजुळ वाऱ्यानें,....
सळसळतीं सारीं रानें !—
झाडांचे शेंडे डुलती,....
खालीं छाया थयथयती !—
धूसर डोंगर–दरी–कडे !—
पीठ सांडलें चोहिंकडे !
जादूची दुनिया हंसरी !—
सुंदर, चंदेरी, दुसरी !—

## ४

अपुलाही तारक—मेळा !—
खेळच आपुलाही चाळा !—
फेर धरूं चंद्राभवतीं–
नाचूं, खेळूं, स्वैरगति !
तुडवित रानें—खांच खडे,....
गुंगुन गाणें म्हणूं गडे !—
“ जादू !—जादू ! चोहिकडे ! !—
आनंदी आनंद गडे ! !—”

२७-७-४४



# बाजारीं चला !




[ कांहीं छोट्या मुली हौसेनें बाजार करायला निघाल्या आहेत. ]

बाजारिं चला, बाइ, चला चला !–तऱ्हेतऱ्हेच्या खरेदिला !

बाजारिं चला, बाइ, चला चला !–फीत घेउं गऽ वेणीला !
लालभडक, जांभळी, रुपेर—
निळी, पांढरी, हिरवी–चार—
शोभा देईल् तो शिणगार !
रंग–संगती येण्याला !–चला बाइ, बाजारिं चला चला ! १

बाजारिं चला, बाइ, चला चला !–आंकडे–गोंडे घेण्याला !
'चिमण्या' त्या अंबाड्यावरती !
गोंडे वेणीसंगें हलती !
कांटे केसांशीं कुजबुजती !
बटा खुलवतील् मग भाला !–चला बाइ, बाजारिं चला चला ! २

बाजारिं चला, बाइ, चला चला !–गजरे–नि वेण्या घेण्याला !
तिथें नव तऱ्हा नाना येती !
चमेलि, जाई,–अन् शेवंती,....
केतकिच्याही पिवळ्या पाती !....
अपुल्या ग आवड–निवडीला !–चला बाइ, बाजारिं चला चला ! ३





…र चला, बाइ, चला चला !–मुखा तजेला येण्याला !
'स्नो'नें येइल् गऽ थंडावा !
वरती 'पफ्'चा हातही हवा !
गंध तांबडें,….काळें, किंवा !
नविन टवटवी वद्नाला !–चला बाइ, बाजारिं चला चला ! ४


बाजारिं चला, बाइ, चला चला !–डूल नव नवे घेण्याला !
झुलती हंसी पाण्यावरती,….
घड द्राक्षाचे ते डुलडुलती,….
किंवा लुडबुडणारे हत्ती !
मुरडुं सदा मग मानेला !–चला बाइ, बाजारिं चला चला ! ५

बाजारिं चला, बाइ, चला चला !–नटुनी थटुनी मिरवाला !
तऱ्हेतऱ्हेचे घालुं ग् कपडे !
टांचा उंचावुन चालुं गडे !
बघतिल सारी टकमक तिकडे !….
नटी सारखें मिरवाला !–चला बाइ, बाजारिं चला चला !
इकडुन तिकडे ठुमकायला !–चला बाइ, बाजारिं, चला चला ! ६

२१-५-४४



# चोर मोठा!



१

वसे पाठीवर,—देव लंबोदर !
अस्थीर आसन,... पडे गजानन !
चांदोबा हासले !—देव रागावले !
[ आसन पळालें !—जगामधें आलें !! ]

२

छकुल्या ओठांशीं,....लांब लांब मिशी !
छोटे छोटे पाय !—तुरुतुरु जाय !
लुकुलुकु डोळे !—घरभर खेळे !
[ इवलिशी भूतं !—परी जगीं कीर्ती !! ]

३

दुधाच्या कपाटीं,....कोठाराच्या पाठीं;
लुगड्या—खणांत,....कोना—कोपऱ्यांत,
फिरतो चौफेर !—त्याला मुक्तद्वार !
[ कोडें मना जाचें—'हें घर कोणाचें ? ?' ]

४

'खुड्बूड् !'...'खुड्बूऽड्ऽ !'—साऱ्यां पडे गूढ !
चाहूल घेऊन,....पाहती जपून !
परी,....शांत,....शांत !—कोणी ना घरांत !
[ चोराचें पाऊल,....कधीं ना वाजेल !! ]



# भारी



५

काळोखाचा राणा !....घालतो धिंगाणा !—
इवलासा पोर !—चोर शिरजोर !
घरांत आपुल्या,....आम्हाला वांकुल्या !
[ आमुचें हें घर !—आम्ही झालों चोर !! ]

६

यानें पचवीलीं,....पुस्तकें मोठालीं !....
झालें सारें रीतें,... तांदळाचें पोतें !—
चाळण रव्याची,...नव्या पातळाची !—
[ करा !—त्वरा करा !—संपेना हा फेरा !! ]


७

होता गाणें गात,....आत्तांच रंगांत !—
खिडक्या नि दारें.. .बंद करा सारें !—
बघा त्या फटींत !—आणि कपाटांत !—
[ शोधा आडगळ !—काढेल तो पळ !! ]


८

चोर मोठा भारी !—हातीं देतो तुरी !—
काठ्या आपटून, हात ये भरून !—
परी याचा खून.. .पडेना अजून !—
[ 'आतां !—आली माऊ !—धांवा उंदिर भाऊ!!' ]


१५-८-४४.



# दादाचं



[ दादाचं लग्न होणार म्हणून ही पोर खूष आहे. गंधा कुंदा सुधीर ही तिचीं भावंडें, भाऊ–आई हीं वडील माणसें, म्हातारा धर्मा गडी व त्याची बायको, स्वतः दादा, नवी वहिनी, साऱ्यांचीच मजा होणार !–ती लग्नाबद्दलचे आपले मागले अनुभव लक्षांत घेऊन, आपल्याशींच एक एक बेत करून आनंदानें नाचते आहे. ]



बाइ माझ्या दादाचंऽलगीऽन !–दादाऽचंऽ लगीऽन !
गममत् जममत् होणार !–माझ्या दादाऽचं लगीऽनऽ !–
वऱ्हाडि कोण कोण जमणार ?–आतांऽ दादाऽचं लगीऽन !–
गममत् जममत् होणार !–माझ्या दादाऽचं लगीऽनऽ !–
भावोजी अन् गंधाताई !–सुधीर–‘ अक्कल–कांदा ! ’
आइ नि भाऊ !–दादाभवतीं लुडबुडणारी कुंदा !–
घेऊन् येइल धर्मा बाइल्–डोबी, बोबड–कांदा !–
मांडव् सारा खच्चुन् भरला !–
आतां रीघ न ग मुंगीला !–
दादाचंऽ लगीऽन !—दादाऽचं लगीऽन. १

कपडे काय काय करणार ?–माझ्या दादाऽचं लगीऽन !–
गममत् जममत् होणार !–आतांऽ दादाऽचं लगीऽनऽ !
रुमाल, कोशे, फेटे, पगड्या,....मांडव झगमगणार !–
कोणी येतिल् नेसुन् शालू, जरिचे लप्फेदार !—
कुंदाताइ नि तिच्या मैत्रिणी फटाकड्या बनणार !—
आई इंदुरचीऽघडि मोडिल !—
भाऊ नवीन टोपी घेतिल् !—
दादाचंऽ लगीऽन !—दादाऽचं लगीऽन !— २


# …लगीन !

फराळ काय काय करणार ?—आतां दादाऽचंऽ लगीऽन !—
गममत् जममत् होणार !—अमच्या दादाऽचं लगीऽनऽ !
चकल्या, शेव, काजू घालुन् करतिल् खमंग चिवडा !—
करंज्या, लाडू, तऱ्हेतऱ्हेचा होइल् फराळ गोडा !—
रुखवत् घेऊन् विहिणी येतिल् !—चला दरोडा पाडा !—
मोतिचुराचाऽ चेंडूऽउडवूंऽ !—
दादाला चिडचिडवुन् रडवूंऽ !
दादाऽचं लगीऽन !—दादाऽचं ऽ लगी ऽ न ! ३

वाजंत्रि काय काय वाजणार ?—आलंऽ दादाऽचंऽ लगीऽनऽ !—
गममत् जममत् होणार !—आतांऽ दादाऽचं लगीऽनऽ !—
मुसलमान तो ताशा,....तड्तड् तण्तण् फोडिल् कान !
बॅन्डवाला ढऽम्म ढऽम्म्....हलविल अपुली मान !—
सनईची ती तान्....आणी टुमुटुमु खणणक्खण् !—
ताशापाशीं विस्तव ठेऊं,....
गुंड्या गवताच्याही देऊं !
दादाऽचं लगीऽन !—दादाऽचं लगीनऽ ! ४

दादा काय काय करणार ?—आतां दादाऽचंऽ लगीनऽ !—
गममत् जममत् होणार !—आलंऽ दादाऽचं लगीऽन !—
पिवळा डगला, शर्ट, पागडी, धोतर रेशिम्—काठी !—
हलतिल माना बाशिंगासह !—करति करवल्या दाटी !—
नवरदेव—बोहलें थाटलें !—वधू—वरांच्या भेटी !—





दादा जाइल् खुसुंखुसुं हासत्,....

मागुन् वहिनी मुरकत् मुरकत् !—

दादाऽचंऽ लगीऽन !—दादाऽचं लगीऽनऽ !—

वहिनी काय काय करणार ?—दादा-वहिनींचंऽ लगीऽन !

गममत् जममत् होणार !-होईल् दादाचंऽलगीऽन !

केंस मोकळे, लुगडें पिवळें,....पुजेल गौरीहार;

मग येईल् ती नटुनी थटुनी मिरवत चपलाहार !

त्रिज्या तोंडतिल दादा-वहिनी !-दादावरती हार !



अमुच्या दादाऽची तीऽ राणी !

उखाण्यांत गोंधळेल वहिनी !

गडबडगुंडा छान् !-होईल् गडबडगुंडा छान् ! ६

अमच्या दादाऽचंऽ लगीनऽ !....दादाऽचंऽ लगीऽनऽ !

गममत् जममत् होणार !-आलंऽ दादाऽचंऽ लगीऽनऽ !!

दादाऽचंऽ लगीऽनऽ !!!

*

९-४-४४



# कोडें



१

[ कोठुनि हा आला इकडे ?—सुटे न हें कोणा कोडें ! ]

* * *

चमचम करतीं ते अजुनी,...ताऱ्यांचे डोळे दोन्ही !
बाल-वदन हें चांदोबा !....आणि तीट त्याची शोभा !—
रडें दाखवी कोर नवी !. ..हास्य पूर्णिमेला खुलवी !—

× × ×

[ नभांतुनी आला इकडे !—सुटलें ग सुटलें कोडें ! !—]

२

[ कोठुनि हा आला इकडे ?—सुटे न हें कोणा कोडें ! ]

× ● ×

धवल सोनुल्या जाईच्या,. ..आणि गोजिऱ्या केतकिच्या,
—एकजीव नव कांतीनें,. ..अंग नटविलें चोरानें !—
पचली कणसाची चोरी;—माथीं मखमल सोनेरी !—
—चांफेकळि नाकावरती !—गुलाब गालावर फुलती !—
बिंब--फळें ओठीं वसती !—कुंदकळ्या वदनीं हसती !—
—कोंब केळिचे ग हात !—पद—कमलीं लाली खुलत !—

* * *

[ वनांतुनि आला इकडे !...सुटलें ग सुटलें कोडें ! ! ]

★

२४-७-४४.

# घरांत फिरती



[ एक लहान मुलगी आपल्या घरचें वैभव वर्णीत आहे. ]

कुणी सांगती--हत्ती झुलती श्रीमंती-संगती !
( अम्हां कां गरिबां त्याची क्षिती ? )
घोड्यावर कुणि टांग टाकुनी, फदड्--फदड् दौडती;
( मज कधीं येड न ते लावती ! )
फड्फड् चाबुक वाजति;....कसरत करिती वाघोबा !
( शेळपट नकोत असले बा ! )
जगांत असतिल हजार कुतरे !. ..दिमाख सांगूं नका !
( मज नको मोठा, वा बारका ! )
वाघाच्या मावशाहि मिळतिल;....दारोदारीं फिरा !
( मला ना आवड त्यांची जरा ! )


*　*　*

या घरांत अमुच्या फिरती हत्ती, घोडे, वाघोबा !
—बघारे....कुतरे....बोकोबा ! !

*　*　*

वाघाची ऐकुन घरांतली ललकारी,
तुम्हि हळुंच येउनी उभे रहा मम दारीं !
घ्या चाहुल !....करते शिकार,....मैसुर स्वारी !
मज भीति वाटते-क्षणभर पुरती !--परि नच मी डरतें-
—वाघ तो धीटपणें धरतें १
हीं आसपासचीं कुत्रीं जमतीं कितीं;
नीं घरासभोंतीं घिरट्या किति घालतीं !
—या घरांत अमुचे श्वानराज गुरगुरती


# हत्ती, घोडे !



मगऽभूऽभूऽक्यँ क्यँ....गुर्र गुर्र....हा नाद भयानक ! तदां,..
—हसें परि खुशाल मी खदखदां ! २



नी सोंड हातभर गज गरगर फिरविती,
दो पाय उभारुन मग मजवर गरजती !
अन् पटकन् विळखा मानेला घालती !
किति ओरडतें मी क्षणभर !—परि मग धीर जरा आणतें...
—हत्तिच्या पाठकुळीं विलगतें ! ३



मग दबकत....दबकत येते....मनि—मांजरी !
करि कमान ती रागानें पंजांवरी;
फुसफुसत् ओरडत धावे अंगावरी !
अति गाळण उडते, समोर पाहुन रूप तिचें भेसुर !
—तिची परि ममता माझ्यावर ! ४

पण दार उघडुनी पहाल डोकावुनी—
मी राणि झांशिची झालेली पाहुनी,
टकमकां सारखे बघाल भांबावुनी !
त्या चार भिंतीच्या घरांत माझी घोड-दौड चौखुर !
—अहो मी बाबां—पाठीवर ! ! ! ५

\+ + +



मला नको ते तुमचे घोडे, हत्ती, वाघोबा !
—आणि ते कुतरे....बोकोबा !
आवडती मज सारे !....परि ना बाबांची त्या सरी !
—बसावें बाबांपाठीवरी ! !
घरांत माझ्या हत्ती, घोडे, कुतरे, वाघोबा !
—जोंवरी घरीं मला बाबा ! ! ! ]

—×—

१८-८-४४



# तुला न सम…




[ पांच सहा वर्षांचा एक मुलगा ओटीवर एकटाच बैठकीवर खेळत होता. आई पाठीशीं उभी असल्याची त्याला दादहि नव्हती— शेवटीं आई कौतुकानें पुढें होते व त्याची ती समाधी मोडते. ]

" मी सर्वांपासुनी, तुला बघत, ही इथें उभी आहे !—
—हं, दचकुं नको !....पण कसले, बाळा, वेडे चाळे हे ? "
" कां ?....कुठें ?—कधीं ग ?...कसले चाळे केले मी, आई ?...
—चल्, हसूं नको !....मी निमूट बसलों,....देव जसा कांहीं !! "
" हो, देव !....खरंच कीं ! ...तक्क्यावर तो बसला ऐटींत !— "
—" अं ?– हं हं !–तो ना, दरबारांतिल राजाचा थाट !—
" पण पाय हालवुन् तक्क्याला का दिलास रे मार ? " ...
—' अग्, शत्रु पळाला !. .त्याच्यामागें मी घोडेस्वार !— "
" मग् हात उगारुन् कोणावर तरि धांवुन गेलास !—
—" त्या पळपुट्–वीरा धरुन म्हणालों, 'कुठें चाललास ?' "
" पण पडुनी खालीं, हळूंच उठुनी, नाक घासलेस ?

.अन् रडव्या वदनें, तक्क्यापाशीं उभा राहिलास ??–"
" अग्, तोच आई तो शत्रु !- शेवटीं शरण मला आला !-
..त्यावेळीं होत्या गळ्यांत माझ्या विजयाच्या माळा ! "

# जत कांहीं !



" पण हात हालवुन, उंच उभ्यानें बडबड रे कसली ?"
—" तें भाषण ग, राजाचं !—माझ्या भवतिं प्रजा बसली !"
" वा ! राजा कां कधि उडी मारतो, वर पसरून हात ?"
—" छे: !—राजा कुठला ?—पंख पसरले उडण्या गगनांत !"
" पण पक्षी कां कधि पडून उताणा, हवेंत पोहेल ?"
—" छे: ! पक्षि कुठें ?—तो मासा होता, समुद्रांत खोल !"
" हंऽ ?—आणि कायरे, माशाला त्या चार पाय कुठले ?"
—" अग, वाघोबा ते !—शिकार करतां करतां गुरगुरले !! "
" मग बघतां बघतां, कंबर मोडून खोकूं लागलास ?"
—" हं. ..ती ना ?—अपुली अजी !.. .लागते तिला सदा ढांस !!"
" चल ! पुरे लबाडा !....आजींहातीं पुस्तक कधि असतें ?"
—" अग गादीवर ओडंगून,....बाबा वाचत होते ते !"

× × ×

" वा: !—राजा, पक्षी, मासा, आजी, क्षणांत बनला ' हे ' ! ..
—हें निमूट बसणं कसलें ? बडबड—खेळ चाले हे !"
" छे:—तुला न समजत कांहीं !—होते सगळे येथें ते ! ..
—मी बोलत होतों माझ्याशीं !—पण नाहित चाळे ते !!"

☆



२८-८-५४

# माझ्या तक्रारी



[ एक चार पांच वर्षांची गोड चुणचुणीत बोलकी पोर, खेळतां खेळतां एकदम घरांत धांवत धांवत प्रवेश करते. आई बाळाला मांडीवर घेऊन त्याचे लाड करीत आहे. बाळ तिचा आवडता; पण त्यानें आपली गादी बळकावली म्हणून तिला त्याचा थोडा मत्सर पण वाटतो. मनांतील या गोंधळामुळें ती बाळाबद्दल आईचें मन 'कलुषित' करण्याचा, आपल्या परीनें असा कसून प्रयत्न करते —]

१

ठेव ना तो खालीं तो !....आतां मला घे न ! !....
नाहींतर बघ,....अशानें रडेन !
नको जा आमाला....तुजा येडा बाळ !....
आहे ही बाहुली !....आणि माझा खेळ !
कशाचा शहाणा ?....आईशीं खेळेल !....
आईच्या पोटाशीं दडेल, हसेल ! !
खालीं ठेव,....आत्तां रडाला लागेल !....
मोठ्यानें....मांजरजसें,....ओरडेल ! !
मला सांगशीं तूं....'बाहेर जा खेळ !....'
याला मात्र घेशीं सदा–सर्वकाळ ! !

२

हें ग काय, आई ?....पुरुष ना बाळ ?....
'माजी छकुली ती !....' कसं म्हणशील ? ?
मिजास पुरे ग,....तुझ्या त्या बाळेची !....
तोंडांतून धार लागली लाळेची ! !
कसे पटापट पापे घेशीं त्याचे ?....
तोंड घाण त्याचें सदा औषधाचें !
नको ग कौतुक !–'बबडी' रडकी !....
कधीं बंद नाहीं तोंडाची खिडकी ! !

३

कोबीच्या कांद्याला चार केंस भूरे !....
मामांच्यासारखे डोळे घारे घारे !

# नको हा नवरा !

हत्तींच्यासारखे कान ते फताडे !....
कसें ग आवडे असें ध्यान येडें ? ?
लाडू लपले त्या गालीं गोल गोल;
वेड्या खादाडाचे खाण्याचेच खेळ !
दूध देशी तरी वखवख कीती ?....
सारखी तोंडांत त्याची बोटें जातीं ! !
तुला तो आवडे,...सदाचा हांवरा !....
माझ्या ठकीलाही नको हा नवरा ! !

४

नकट्या वाटेनें गेली मालगाडी....
चिन्याशीं करशीं कशी लाडीगोडी ?
पाहिजे कशाला बाळाचा तो तोरा ?....
दिसे उंच उंच पोटाचा नगारा !
अंघोळीच्या वेळीं,....तेलानें माखेल !....
रडेल, वांकेल,....कधीं ना चुकेल !
अंगभर पीठ !....कपाळाला तीट !....
काजळाच्या मिशा !....अहाहारे थाट ! !
चुकूं चुकूं बोटें चोखत झोंपले !....
खालीं ओलें झालें !...साहेब उठले ! !

५

पहा नळ खालीं,....वाहतो सारखा !...
सभोंतीं सांचला समुद्र बारका ! !
भिजल्या चड्डयांचा कोपऱ्यांत ढीग !....
कसा बाई तुला येई ना ग राग ? ?
नको !—नवा झगा माखवील माझा !....
पळा ग ऽ बाईनो !—आला तेलीराजा ! !
पुरे लाड, आई ! !—संभाळ !—संभाळ ! !
करील हा तुझं खराब पातळ ! !

२०-८-४२.





# जीवन द्याव

१

दर्या-पोटीं मासा,....वळवळतो छोटासा !....
खोल खोल तो जाई !—कुठवर ? न कळे कांहीं !...
[ " कां बा हा आकांत ?....खोल जाशि किति आंत ? ? "]
—छे: ! तो तळांत गेला !—सागर घरटें त्याला !!

२


नभीं भिरभिरे घार,....अवखळ अचपळ नार !
गिरगिर गिरक्या मारी !....येइ न तिजला घेरी !...
[ " फिर ग फिर माघारीं !—कुठवर करशिल फेरी ? ? "]
—छे: ! ती झाली ठिपका !....ऐकु न जातिल हाका !—
गेली....विरली—पार,—आकाशांत अपार !

३

[ " वर वर पोहत जाशीं,....उंच उंच आकाशीं !....
कुठे ग जाशीं, बाई ? ...इतुकी कां तुज घाई ?....
ढगांत अडखळशिल ना !.. .उन्हांत कोळपशिल ना !. .
बसशिल कोठें ? सांग ?....आकाशांत अथांग ?....
कोण तिथें तुज तारी ?....कोणि नसे शेजारी !....
आणि न जवळीं आई !. .भीती ठायीं ठायीं !....
आवर आवर वेग !....घरट्याजवळीं ये ग !!" ]

* * * *

यावें !



का हिज नाहीं घरटें ?....म्हणुनि न थारा कोठें !
आकाशावर स्वार !–आकाशाच घर दार ! !

४

पाहुन जीवन यांचें,....माझें मानस नाचें !
“ मासा व्हावें ... .जावें. .दर्यातळ गांठावें ! ! ”–
“ नभांत होऊन घार,....गिरक्या मारिन स्वैर ! ! ”
फिरेन मग माघारीं,....बघुनी आई दारीं !

५

एकच किंतु मनांत,. ..सलतो मज दिन रात !
कां न तयां वाटावें. ..‘ जीवन घ्यावें–द्यावें ! ’
कां न तयां वाटावें.. .‘ अपुलें जग बदलावें ! ’
एक दुजानें व्हावें !....नव नव सुख चाखावें !
नभांत होउन घार....गिरक्या घ्याव्या स्वैर !
मासा व्हावें !.. .जावें, दर्या–तळ गांठावें !!
करून सुखाची वारी,....परतावें माघारीं !!

❀

२४-७-४४

# नवरा शोधा

[ एक आठ वर्षांची मुलगी आपल्या बाहुलीला नटवून, एकटीच खेळत बसली आहे. खेळतां खेळतां आपल्याशींच नाचत गाणें म्हणते. ]



१

आतां, चला बाइ, लागूंऽया कामाला–
कुणि नवरा ग् शोधाऽया पोरीला ! ध्रु०
वा: ! लहान कां तूंऽआतां, पोरी ?
मज हसतिल ना माझे शेजारी !
ही झाली, म्हणतिल, घोडी नवरी !
चला, करा बाइ, घाऽऽऽईऽ !
आतां सुचत न कांऽऽऽहीऽ !
या नवराऽशोधाऽग पोरीला !
आतां, चला बाइ, लागाऽग् कामाऽलाऽ !

२


ती भिवयांमधली टिकली सुंदर,
अन् चमकी चमचमते नाकावर,
किति लांब सडक शेंपटा पाठिवर !
अन्....पाऽयींऽ बूऽऽटऽ !
अहा....मोठ्ठा ग थाऽऽटऽ !
आतां नवरा शोधा न पोरीऽला–
हं....चला बाइ, लागूंऽया कामाला ! २

३

हं–आहेऽब्बोवाऽ ! आतां ऽ काय ?
किति मोऽठ्ठि झालि ही माझी ऽ बाय !
नवि साडीऽ नेसुन् ठुमकत् जा ऽ य ऽ !!
झालि नवरीऽ मोऽठ्ठी ऽ!
आतां कां मग खोऽऽटी ??

# ग पोरीला !

कुणि नवरा शोधा ऽ न् पोरीला !
अतां चला बाइ, लागा ऽ जा कामाला ! ३



४

या भोळ्या माऽझ्या ऽ ग बाळेला,
कधिं कोणी ऽ येतिल् पाहा ऽ या ऽ ला !
ती हळूंच लाजल् !—खाली गाला ऽ ला ऽ !
अन् मुरकिल् मा ऽ ऽ न ऽ !
मग भुले ऽ ऽ ल भा ऽ ऽ न !
किती नवरा ग् सुरेख पोरीला !
हं–चला बाइ, लागा ऽ ग लग्ना ऽ ला! ४




५

बघा घटका भरली ऽ!–वेळ न दवडा !
हं–सावधा ऽ न !–वाजंत्रि–चौघडा !
कुणि वरातिचा ऽ जा ऽ सजवा ऽ घोडा !
पोरि,—सा ऽ व ऽ धा ऽ न ऽ !
सारे सा ऽ व धा ऽ ऽ न !!
आहा नवरा ऽ मिळे ऽ ल नवरी ऽ ला ऽ !
तुम्हि या बाइ, पोरीऽच्या लगना ऽ ला ऽ ! ५



६

हा धरला ऽ आतां ऽ अंतर–पा ऽ ट ऽ !
तूं सुखांत पडशिल् ! हो ग ऽ धी ऽ ट ऽ !!
आतां तुझिन् माझि जरि ताटा ऽ तू ऽ ट,
हें लागे ऽ ल ऽ ऽ ग्न ऽ !—
आतां, सा ऽ व ऽ धा ऽ ऽ न ऽ !!
किति सुरेख नवरा ऽ, पोरि, तुला ऽ !—
चल्, सासरिं जा ऽ ग ऽ नांदा ऽ ला ऽ ! ६



१०-४-४४

## गुज गोष्ट—

प्रिय किशोरा,
किशोरी,

या 'गीत-ज्योती' तुझ्या पुढें ठेवतांना मला अतिशय आनंद होत आहे.—पण व्यक्तिगत थोडें दुःखही होत आहे. दुःख एवढ्याचेंच, कीं, हीं गीतें जिच्यासाठीं लिहिलीं जाणार होतीं, ती माझी छोटी मुलगी ज्योति, (हीं गीतें साभिनय म्हणून दाखवण्या पूर्वींच) मला सोडून गेली. पण उलट, आनंदच अधिक होत आहे. तो असा कीं, तिच्या स्मृतीच्या निमित्तानें कां होईना, केवळ विरंगुळा म्हणूनच मी हें काम अधिक मनावर घेतलें, व त्यामुळेंच, या 'गीत-ज्योती' निदान सादर करतां आल्या मला.

या संग्रहांतील सारीं गीतेंच तुला आवडतील, अशी मला खात्री आहे. कदाचित्, तुला कांही समजलीं नाहीत किंवा आवडलीं नाहीत, तर तीं कोणाकडून तरी तूं समजावून मात्र घे. कारण आपल्याला पटकन् समजतें, तेवढेंच नेहमीं चांगलें असतें, ही कल्पना बरोबर नव्हे.

दुसरी गोष्ट या गीतांच्या चालींबाबतची—तें सारें या आवृत्ती पुरतें तरी मी तुझ्यावरच सोंपवतो. पण प्रग गीत हें चालीवर म्हटल्यावांचून मजा नाही. दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास माझ्या चालींचें नोटेशन देईन.

या संग्रहाची छपाई-चित्रीकरण अभिनव प्रकारें करून घेण्याची माझी आकांक्षा मूर्त स्वरूपांत आणल्याचें सारें श्रेय, माझे मित्र श्री. अप्पा फाटक यांचेंच. तेव्हां त्यांचे आभार तूंच परस्पर मानणें योग्य. या संग्रहांतील आवडेल तें सारें आपल्या मित्र-मैत्रिणींना दाखव, करव.—हो, आणि मलाही कळव.

मातृदिन-(१८-८-४४) } तुझा खेळगडी—रघुवीर

# गीत-ज्योती

[ २ ]

याहून आकर्षक पद्धतीनें तयार करून
पुढील वर्षाच्या 'अमर ज्योति वाङ्मया'च्या
गटांतून प्रगट होईल.

म. ग्रं. सं. ठाणे; वाचनालय ठाणे.
अ. क्र. २००६० नों. दि. ...........
वि. ....आ. वा.... क्र. ...........

## आमचे ऋणानुबंधी—

श्री. वासुदेव त्र्यं. यार्दी, एम्. ए. बी. टी. (प्रिन्सिपॉल, न्यू इंग्लिश स्कूल, वसई), श्री. गो. स. नणदीकर, बी. एस्सी., बी. टी. (पुणें); श्री. शांताराम बी. सबनीस, एम्. ए. बी. टी. (बडोदें); श्री. तिमाप्पा ए. कामत, बी. ए. बी. टी. Dip. Phy. Ed. (मुंबई); श्री. मधुकर वा. घोंड, एम्. ए. एल्एल्. बी. एस्. टी. सी. (मुंबई); श्री. के. जी. कुळकर्णी, बी. ए. बी. टी. (मुंबई); श्री. ना. गो. तवकर, बी. ए. एस्. टी. सी. (प्रिन्सिपॉल, दादर विद्यामंदीर); डॉ. मुकुंद दि. मनोहर एम्, एस्सी. पी. एच्डी. (मुंबई); श्री. श्रीनिवास स. पाटकर, बी. ए, एस. टी. सी. (मुंबई); श्री. व्ही. एच्. फाळके, बी. एस्सी. बी. टी. (नासीक); श्री. एस्. एन्. मोकाशी, बी. ए. बी. टी. (मुंबई); आणि इतर स्नेही.

IRBK-0102007

IRBK-0102007

या संस्थेच्या कार्यांत फायद्याची विशेष दृष्टी नसली तरी व्यवहार संभाळणें व त्या बाबतींत संभाळून पाऊल टाकणें भाग आहे. **संस्थेला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर व गुंतलेली रक्कम मोकळी होण्यावरच संस्थेचें प्रत्येक पुढील वर्षाचें कार्य मुख्यतः अवलंबून रहाणार.** तेव्हां (संस्थेला मिळणाऱ्या आश्रयाचा आगाऊ अंदाज येण्यासाठी) **आम्ही 'कायम ग्राहकत्वा'ची योजना उपयुक्त म्हणून मुक्रर केली आहे.** पुस्तकाची कितीही लहान आवृत्ती काढली तरी **ग्राहकांना त्यांची प्रत प्रथम मिळेल.** आणि ती पुन्हां **सामान्य गिऱ्हाइकापेक्षां अधिक सवलतीनें मिळेल.** शेवटीं हा प्रश्न सदिच्छा व सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें **फक्त मामुली चार आणे प्रवेश फी** घेऊन कोणत्याही मुलामुलींस आम्ही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं. ग्राहकानें संस्येतर्फे प्रसिद्ध होणारी **दरवर्षींचीं सर्वच प्रकाशनें विकत घेतलीं पाहिजेत, असा आमचा आग्रह राहणार नाहीं.** (घेतलीं तर तीं त्याला सवलतीनें मिळतीलच.)

मात्र **कोणतीहि गटांतील पांच रुपयाचीं पुस्तकें नक्त रुपये चार किंमतीस त्याला मिळतील,** तीं पुस्तकें दरवर्षी त्यानें घेतलीं, तरच त्याचें ग्राहकत्व कायम राहून पुढेंहि त्याला सवलत मिळत राहील. **पुस्तकाची किंमत परिस्थितीनुरूप परवडेल तितकी कमीतकमी ठेवणार आहोंत. पण तरीही सामान्य गिऱ्हाईकापेक्षां अधिक सवलत कायम ग्राहकासच मिळणार आहे.** तेव्हां या योजनेचा फायदा घेण्याची इच्छा असणाऱ्या पालकांनीं संस्थेशीं याप्रकारें जरूर सहकार्य करावें.

**प्रथम वर्षाची विशेष फायद्याची 'परिचय सवलत--'**

**या वर्षाच्या एकूण बारा पुष्पांची किंमत रु. ५-१३-० होते.** चार आणे प्रवेश फी भरल्यावर **हींच सर्वांगसुंदर पुस्तकें ग्राहकांना रु. ४-१३-० स पडतील.** पालकांचा नवीन परिचय व्हावा म्हणून व संस्थेच्या ग्राहक योजनेला मूर्त स्वरूप यावें म्हणून रु. ४-१३-०+०-४-०=५-१-०) **अशीं एकूण नक्त रु. ५-१-० चीं हीं पुस्तकें, रु. ४-१२-० मनीऑर्डरीनें पाठविल्यास, आमच्या खर्चानें अनरजिस्टर्ड बुकपोस्टानें आमच्या या नवपरिचित ग्राहकाला पाठवून त्याचें नांवही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं.**

**कचेरी:—अमर ज्योति प्रकाशन, १४ बी. हरजीवन एस्टेट, दादर.**

रघुवीर सामंत संपादित

# अमर

## — ज्योति वाङ्मय —

* नव्या दृष्टीचीं, नव्या पद्धतीचीं, हीं नवीं विविध पुस्तकें आपल्या मुलामुलींच्या हातीं द्या!—
* तीं त्यांची करमणूक करतीलच; पण त्याबरोबरच त्यांना अधिक रसिक बनवतील!—
* हीं व असलीं पद्धतशीर पुस्तकें अव्याहत प्रकाशित करण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन-संस्थेचे, फक्त चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील.

## ❀ प्रथम वर्षांतील ❀

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

**I न्याय-चातुर्य-कथा**

( किशोर श्रेणी )

१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा

२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा

३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा

४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

**II सत्यकथा—**

( कुमार श्रेणी )

१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा

२ शूरांचा गांव आणि इतर कथा

**III अभिनय-गीतें**

( किशोर श्रेणी )

१ गीत ज्योती

**IV दीर्घ-कथा**

१ कांहीं कमळें

**V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी**

( कुमार श्रेणी )

१ चार वीर

२ 'प्रफुल्लचंद्र'

[ ज्ञान विभाग ]

**VI शास्त्रीय कुतूहल.**

१ माणसाचें शेंपूट.

कुमार श्रेणी

**VII वाङ्मयीन चर्चा.**

१ 'मी लेखक होणार.'

खानविलकर लिथो प्रेस; मुंबई २.